# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 July 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जुलै २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- १६ व्या रोजगार मेळाव्याचं आज देशभरात आयोजन–५१ हजारांहून अधिक युवकांना, पंतप्रधानांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वितरण
- राज्यभरात तीन हजार ३६७ धार्मिक स्थळांवरचे भोंगे हटवले–भोंगेमुक्त मुंबईची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- महानगरपालिका निवडणुकांसाठी इतर तयारीसह ईव्हीएम सज्ज ठेवण्याचे निवडणूक आयुक्तांचे निर्देश
- ‘अद्वितीय वैश्विक मूल्य’ म्हणून शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या यादीत समाविष्ट

आणि

- लॉर्डस् कसोटीच्या पहिल्या डावात भारत २४२ धावांनी पिछाडीवर

****

१६ वा रोजगार मेळावा आज देशभरात आयोजित करण्यात येणार आहे. नव्यानं नियुक्त झालेल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे नियुक्ती पत्रांचं वितरण केलं जाईल. राज्यात नागपूर आणि मुंबईसह देशभरात ४७ ठिकाणी हा मेळावा होत आहे. गेल्या १५ रोजगार मेळाव्यांमधून १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं प्रदान करण्यात आली आहेत.

****

राज्यभरातल्या एकंदर तीन हजार ३६७ धार्मिक स्थळांवरचे भोंगे आतापर्यंत हटवण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान ही माहिती दिली. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

शिर्डी आणि पंढरपूरच्या धर्तीवर शनिशिंगणापूर देवस्थानात मंदिर समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिली.

धर्मांतर करूनही आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांवर कारवाईचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला. सदस्य गोपीचंद पडळकर यांनी याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

****

शेतमालाची ने–आण सुलभ करण्यासाठी पुढच्या पाच वर्षात राज्यातील सगळे शेतरस्ते मजबूत करणार असून, यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ते म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

धुळे सोलापूर तसंच कल्याण विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्गांवर होणाऱ्या रस्ता अपघात मृत्यू प्रकरणी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी सूचना मांडली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावर उत्तर देतांना, अपघात प्रवण स्थळांची दुरुस्ती निर्धारित वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाईचा इशारा दिला. आमदार सुरेश धस, आमदार अमित देशमुख आदींनी या लक्षवेधीच्या चर्चेत सहभाग घेतला.

****

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक काल विधान परिषदेत संमत झालं. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हे विधेयक सदनात सादर केलं. महाविकास आघाडीने या विधेयकाला विरोध दर्शवत मतदानापूर्वी सभात्याग केला.

दरम्यान, या विधेयकाविरोधात वंचित बहुजन आघाडीने न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. आघाडीचे नेते विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी, हे विधेयक महाराष्ट्राच्या सामाजिक न्यायाच्या ऐतिहासिक वाटचालीवर आघात करणारं असल्याची टीका केली आहे.

****

राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये असलेली विमानतळ सुविधा, येत्या काळात ३० जिल्ह्यांमध्ये वाढवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत केंद्रीय नागरी हवाई मंत्रालयाच्या 'वेस्टर्न रीजन मिनिस्टर कॉन्फरन्स'मध्ये बोलत होते. केंद्रीय मंत्री के.राममोहन नायडू यांनी यावेळी बोलतांना, देशात विमानसेवेमार्फत 'कनेक्टीव्हीटी' वाढवण्यावर भर दिला जात असल्याचं सांगितलं.

****

छत्तीसगडमधल्या नारायणपूर जिल्ह्यात २२ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर काल आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर सुमारे साडे सदतीस लाखाचं बक्षीस होतं.

****

'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत ही माहिती दिली. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसंच तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

****

महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी पूर्वतयारी करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सज्ज ठेवण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. ते काल विभागीय आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्तांच्या बैठकीत बोलत होते. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आवश्यक साहित्यासह मनुष्यबळाची आपल्या स्तरावरील उपलब्धता लक्षात घ्यावी, अशी सूचना वाघमारे यांनी दिली.

****

मराठवाडा साहित्य परिषदेचे भगवंत देशमुख कुटुंबीय प्रायोजित चार पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. छत्रपती संभाजीनगर इथले कवी रवी कोर्डे यांच्या `भुंड्या डोंगराचे दिवस` या काव्यसंगहाला कुसुमताई देशमुख काव्यपुरस्कार, श्रीरामपूर इथले जगदीश पवार यांना कुमार देशमुख नाट्यपुरस्कार, तर सोलापूर इथले समीर गायकवाड यांच्या `गवाक्ष` या ललित लेखसंग्रहाला भगवंत देशमुख विशेष वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे. रवी कोर्डे यांनी या पुरस्काराबद्दल परिषदेचे आभार मानतांना, आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या....

**बाईट – रवी कोर्डे**

****

क्रिकेट

तेंडुलकर अँडरसन कसोटी क्रिकेट मालिकेत लंडनच्या लॉर्डस् मैदानावर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात भारत २४२ धावांनी मागे आहे.

काल सामन्याच्या दुसऱ्या दिवशी यजमान संघाचा पहिला डाव ३८७ धावांवर संपुष्टात आला. जसप्रित बुमराहनं पाच, रविंद्र जडेजानं एक तर नितीश कुमार रेड्डी आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. भारताची सुरुवातही अडखळत झाली, सलामीवीर यशस्वी जयस्वाल १३, कर्णधार शुभमन गिल १६ तर करुण नायर ४० धावा करून बाद झाले. कालचा खेळ थांबला तेव्हा भारताच्या १४५ धावा झाल्या होत्या. के एल राहुल ५३ तर उपकर्णधार ऋषभ पंत १९ धावांवर खेळत होते.

****

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड इथं केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १४८ पोलिसांचा दीक्षांत समारंभ काल पार पडला. उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकं प्रदान करण्यात आली. यावेळी चित्तथरारक प्रात्यक्षिकांचं सादरीकरण करण्यात आलं.

****

जागतिक लोकसंख्या सप्ताह सध्या पाळण्यात येत आहे. या निमित्तानं धाराशिव इथं विविध जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून कुटुंब नियोजनाच्या विविध पद्धतींबाबत माहिती दिली जाणार आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी समाजाच्या सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर विभागात येत्या ३० सप्टेंबरपर्यंत एक विद्यार्थी एक वृक्ष उपक्रम राबवण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी ही माहिती दिली. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण आणि वन विभागाच्या वतीने पहिली ते बारावी तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रकारची रोपं मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

****

शेतकरी आणि कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी लातूर जिल्ह्याच्या रेणापूर तालुक्यातल्या पन्नगेश्वर खाजगी साखर कारखान्यावर काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मोर्चा काढला. मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगरातल्या मुख्य रस्त्यांच्या बाजूने उपरस्ते बांधण्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपये निधी देण्याची मागणी विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर यांनी केली आहे. या मागणीचं निवेदन केणेकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे सादर केलं आहे. शहरात सध्या सुरू असलेल्या अतिक्रमण हटवण्याच्या धडक कारवाईमुळे अनेक रस्ते मोकळे होत आहेत.

****

हवामान

मध्य महाराष्ट्राचा घाट भाग तसंच मराठवाड्यात आज अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विभागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाजही हवामान खात्यानं वर्तवला आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणातला पाणीसाठा ७२ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

****